# प्रेस नोट

## जिल्हा परिषद पदभरती सन 2023-24 बाबत महत्वाची सुचना

दिनांक 18 **जुलै** 2024 **ते** 30 **जुलै** 2024 या कालावधीत **मुख्य सेविका/पर्यवेक्षिका, आरोग्य परिचारिका (आरोग्य सेवक (महिला)), आरोग्य सेवक (पुरुष)** 40 %, **आरोग्य सेवक (पुरुष)** 50% **(हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी) व कंत्राटी ग्रामसेवक** या पदाचे परिक्षा नियोजित आहेत. त्यानुषंगाने **महिला उमेदवारांचे लक्ष जिल्हा परिषद, जळगाव पदभरती जाहिरात 01/2023 मधील मुद्या क्रमांक 4.6 (ओळख पटवणे) कडे वेधण्यात येत आहे**. परिक्षा केंद्रावर येतांना केंद्रावरील प्रवेशा बाबत स्पष्ट पणे नमुद केले आहे की, **ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. जर प्रवेशपत्रावरील फोटो/नांव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास मुळ राजपत्रित अधिसुचना किंवा मुळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तृत केले तरच त्यांना परिक्षेसाठी प्रवेश देण्यात येईल**. ज्या महिला उमेदवारांचे नावात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. परिक्षा केंद्रावर प्रवेशाकरिता अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे **पॅन कार्ड** (Pan Card)/ **पारपत्र** (Passport)/ **वाहन चालक परवाना**(Driving Licence)/**मतदार ओळखपत्र** (Voter ID)/**आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक/फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेजचे फोटोसहीत ओळखपत्र/बार कॉन्सिलचे ओळखपत्र** हे केंद्रावरील समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करावे लागतात. त्यामुळे उमेदवारांचे प्रवेशपत्रावरील नांव व लग्नानंतरचे नांव यामध्ये तफावत असल्यास त्याबाबत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे परिक्षा केंद्रावर पुरावा सादर केला नसल्यास त्यांचे परिक्षा केंद्रावरील प्रवेशाकरीता संबंधित ओळखपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेच **विवाहीत महिला उमेदवारांचे बाबतीत प्रवेशपत्र** (Halltiket) **वर लग्नापुर्वीचे नाव असेल व पॅन कार्ड वर लग्नानंतरचे नाव व वडिलांचे पुर्ण नांव असले तरी सदर पॅनकार्ड ओळखपत्र म्हणुन ग्राहय धरले जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अशा परिस्थितीत संबधित उमेदवारांना मुळ विवाह प्रमाणपत्र किंवा नांवात बदल केल्याबाबतची राजपत्रित अधिसुचना सादर करणे अनिवार्य राहील**.

त्यामुळे उमेदवारांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, **ओळखपत्रावरील नाव व प्रवेशपत्रावरील नाव हे सारखे असेल असे ओळखपत्र परिक्षा केंद्रावर परिक्षेचे वेळेस सादर करावे**. तसेच परिक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवाराचे केंद्रावरील प्रवेश नाकारण्यात येईल. रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना हे ओळखपत्र म्हणुन ग्राहय धरता येणार नाही. तेव्हा जाहिरात व प्रवेशपत्र यातील सर्व सुचनांचे बारकाईने अवलोकन करुनच उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

**दिनांक** :- 10/07/2024
**ठिकाण** :- जिल्हा परिषद,जळगांव

स्वाक्षरी/-
**अंकित (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव.**